"C:\Users\hp\Desktop\takrar nivaran\तक्रार निवारण प्राधिकारी."

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

जिल्हा मुख्यालय, पालघर-बोईसर रोड, कोळगाव,
ता.जि.पालघर पिनकोड-४०१४०४
Email ID:- nregapalghar@gmail.com /egsdycoll.pal-mh@gov.in

**(मगांराग्रारोहयो शाखा)**

दिनांक - ११/१२/२०२४

---

**पाहिजेत**

तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना सर्व साधारण जनतेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा निपटारा करणे व योजनेच्या कामात पारदर्शकता राखण्याकरीता उपाययोजना सुचधिणे यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ च्या (६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) अनुसूची-२ मधील कलम २९ नुसार पालघर जिल्ह्याकरिता तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson) यांची नेमणूक करावयाची आहे.

**किमान पात्रता :-**

- केंद्र शासनाचे क्र.L-११०११/२१/२०१२/RE-VII दि.१६/०१/२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांच्या निकषानुसार पात्र उमेदवार असावा.
- उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवारास लोकप्रशासन/विधी/सामाजिक कार्य शैक्षणीक किंवा व्यवस्थापन क्षेत्रातील किमान वीस वर्षांचा अनुभव असावा, उमेदवार पालघर जिल्ह्यातील रहिवासी असावा.
- उमेदवाराचे वय दिनांक- ०१/१२/२०२४ रोजी ६७ वर्षापेक्षा जास्त नसावे.
- उमेदवार हा राजकिय पक्षाशी संबंधित नसावा.
- उमेदवार शारीरिक दृष्ट्या सदृढ तसेच जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात दौरे, निरिक्षण करण्यास सक्षम असावा.

**कालावधी व मानधन :-**

- या पदावरील नियुक्तीचा कार्यकाल दोन वर्षाकरिता असेल तथापि, कामगिरी समाधानकारक नसल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.
- त्यांचे कार्यालय संबंधित जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.
- शासन परिपत्रक क्र.२०१३/प्र.क्र.-१६५/रोहयो ६ अ दि.१४/०८/२०१३ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तक्रार निवारण प्राधिकारी यांना प्रती बैठक रु.१०००/- या दराने (कमाल रु.२०,०००/- प्रति माह या मर्यादेत) मानधन देण्यात येईल.
- तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson) या पदाची तपशिलवार माहिती, नियुक्तीच्या अटी/शर्ती व अर्जाचा नमुना, केंद्र शासनाच्या दिनांक १६/०१/२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांद्वारे निश्चित करण्यात आला असून त्याची प्रत केंद्र शासनाच्या www.nrega.nic.in या संकेतस्थळावर तसेच उपजिल्हाधिकारी (रोहयो), पालघर यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

इच्छूक उमेदवारांनी स्वतःची शैक्षणीक अर्हता व अनुभवासंबंधीच्या प्रमाणपत्रांसह जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, पालघर यांच्या नांवाने अर्ज तयार करावा व सदर अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो) पालघर, (पहिला मजला क्र. १११), जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, पालघर-बोईसर रोड, कोळगांव, ता.पालघर, जिल्हा-पालघर पिनकोड- ४०१४०४ यांचे कार्यालयात दिनांक ११/१२/२०२४ ते दिनांक १८/१२/२०२४ सायं. ५.३० वाजेपर्यंत सादर करावा, उशिराने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

उपजिल्हाधिकारी (रोहयो) पालघर कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाची नामांकने मुळ कागदपत्रांसह खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शासनास सादर करण्यात येतील.

| अ.क्र. | विहीत नमुन्यात अर्ज | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी कार्यालयाने अर्जाची प्राथमिक छाननी करण्याच दिनांक | दि.१९/१२/२०२४ |
| २ | जिल्हाधिकारी यांनी उमेदवारांची यादी शासनाकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.२०/१२/२०२४ |

दिनांक: ११/१२/२०२४
ठिकाण: पालघर

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक,**
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, पालघर**